# मराठी मंडळांतून फेरफटका

**महाराष्ट्र मंडळ लॉस अँजलिसने** वंदना गुप्ते आणि राणी वर्मा यांचा 'ती' हा अभिनव कार्यक्रम १९ जूनला आयोजित केला होता. हा कार्यक्रम मुख्य शहरापासून दूर ३० मैलांवर असलेल्या सिमी व्हॅलीत, खास तेथील मराठी लोकांसाठी करण्यात आला. एका मुलीचा जन्मापासून ते आजी होण्यापर्यंतचा प्रवास वंदना गुप्ते यांनी दृक्‌श्राव्य माध्यमातून, लहान मुलांच्या नृत्यासह सादर केला. राणी वर्मा यांनी ह्या 'ती' च्या प्रवासातील विविध वळणांवर गाणी गायली. अभिनव स्वरूपाचा हा कार्यक्रम अभिजात रसिकांची मनमोकळी दाद घेऊन गेला.

**प्राध्यापक किशोर जी. कुलकर्णी (डेन्वर, कोलोराडो) यांना महाविद्यालयातील उल्लेखनीय सेवेबद्दल पुरस्कार :** आंतराष्ट्रीय ख्यातीचे अर्थतज्ञ, आणि इंडियन जर्नल ऑफ इकॉनॉमिक्स अँड बिझिनेसचे प्रमुख संपादक, अर्थशास्त्राचे प्राध्यापक किशोर जी. कुलकर्णी यांना मेट्रोपोलिटन स्टेट कॉलेज ऑफ डेन्वर, कोलोराडो तर्फे उल्लेखनीय कार्याबद्दल यंदाचा पुरस्कार देण्यात आला. यापूर्वीही अर्थशास्त्रातील संशोधनाबद्दल डॉ. किशोर कुलकर्णी यांना अनेक पुरस्कार मिळाले असून अर्थशास्त्र विषयात त्यांचे सुमारे १०० शोध निबंध आणि ८ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

**मराठी नाटकातील संगीताचे स्थान** हा एक आगळा वेगळा कार्यक्रम नुकताच सॅन फ्रान्सिस्को- बे एरियात केला गेला. प्रभाकर साठे, ई प्रसारण आणि कला यांच्या संयुक्त विद्यमाने केलेल्या ह्या कार्यक्रमात दिडशेहून अधिक वर्षे जुन्या मराठी नाटकात संगीताचा अंतर्भाव कसा झाला आणि त्याचा नाट्यावर कसा प्रभाव पडला याचा मनोरंजक आढावा घेण्यात आला. तीन तास रंगलेल्या या कार्यक्रमाला प्रेक्षकांनी शेवटी उभे राहून टाळ्यांच्या गजरात आपली पसंती दर्शवली. सौभद्र, स्वयंवर, शारदा, पंडितराज जगन्नाथ, मदनाची मंजिरी, देव दीनाघरी धावला, कट्यार काळजात घुसली या नाटकांतील पदे व गीतांचा यात समावेश होता पुण्यातील प्रसिद्ध रघुनाथ ड्रेसवाले यांनी या कार्यक्रमासाठी खास वेषभूषा तयार केली होती. काही कलाकार अन्य प्रांतातील रहिवासी असले तरी आधुनिक तंत्रांचा वापर केल्याने तालमी घेणे सुलभ झाले. एक आगळा वेगळा कार्यक्रम सादर केल्याबद्दल प्रभाकर साठे, ई प्रसारण आणि कला संस्थेचे अभिनंदन. **मिलिंद गोखले, डेन्व्हर, कोलोराडो**

**बृहन्महाराष्ट्र मंडळ आता फेसबुक आणि ट्विटरवर** जगामध्ये सर्वत्र सोशल मीडियाने उधाण मांडलं आहे. अख्खं जग फेसबुक आणि ट्विटरमुळे लहान होत आहे. आपल्या मित्रांशी, मग ते जगाच्या पाठीवर कुठेही असोत, फेसबुक आणि ट्विटरमुळे संपर्क ठेवणं सुकर झालं आहे. मग या क्रांतीचा एक हिस्सा बनण्यात बृहन्महाराष्ट्र मंडळ मागे कसं राहील? बृहन्महाराष्ट्र मंडळाने नुकताच स्वत:चा फेसबुक ग्रुप आणि ट्विटर अकाऊंट चालू केला आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या या फेसबुक ग्रुपमुळे उत्तर अमेरिकेच्या तमाम मराठी मंडळींना एकमेकांशी आणि बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी थेट संवाद साधता येईल. या फेसबुक ग्रुपमध्ये सामील होण्यासाठी आपण Bruhan Maharashtra Mandal असा इंग्रजीतून फेसबुकवर शोध घ्या. तसेच थेट ग्रुपला भेट देण्यासाठी पुढील दुवा वापरा – http://bit.ly/bmmgroup. अल्पावधीतच या ग्रुपचे सदस्यत्व ३५०वर पोचले आहे. ते अधिक वाढवण्यासाठी आपल्या मित्र-मैत्रिणींनाही आपण आमंत्रण द्या. ट्विटरवर बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या प्रोफाईलला भेट देण्यासाठी http://twitter.com/bmmorg दुव्याला भेट द्या. ट्विटरमुळे मंडळाच्या उपक्रमाची माहिती आपल्याला सेलफोनवर एस्. एम्. एस्. मेसेजकरवी मिळू शकेल. **- वैभव पुराणिक**

**कॅलिफोर्निया आर्टस असोसिएशन उर्फ 'कला'** या बे एरियातील संस्थेने जून आणि जुलै महिन्यात दोन अभिनव उपक्रम सादर केले. – **एकांकिका महोत्सव:** बृ. मंडळ आणि मराठी नाट्य परिषद यांनी शिकागो येथे आयोजित केलेल्या एकांकिका स्पर्धेत वेस्ट कोस्ट वरून सर्वात जास्त म्हणजे सहा एकांकिका सादर करण्यात आल्या होत्या. परंतु बहुतेक सर्व एकांकिकांचा पहिला आणि एकमेव प्रयोग शिकागो मध्येच झाला. बे एरियातील 'कला'प्रेमी प्रेक्षकांना या राष्ट्रीय पातळीवर सादर झालेल्या एकांकिका पहायला मिळाव्या आणि वेस्ट कोस्टवरील सर्व उत्साही रंगकर्मींना एकत्र येण्याची संधी मिळून त्यातून उत्तम विचारांचे आदान प्रदान व्हावे या हेतुने पु. ल. देशपांडे यांच्या दहाव्या स्मृतिदिनी म्हणजे १२ जून रोजी ४ एकांकिकांचा महोत्सव घडवून आणण्याचे ठरले.

लक्षणीय लेखनाचे पारितोषिक मिळालेली अमृता हर्डीकर लिखित आणि बे एरियातील कलाकारांचा भाग असलेल्या 'निळाई आणि पसारा' या एकांकिकेने महोत्सवाची सुरवात झाली. त्यानंतर लॉस एंजेलिसच्या मल्हार अंभईकर दिग्दर्शित विजय तेंडुलकर लिखित 'वैऱ्याची रात्र', बे एरियातील निरंजन पागे दिग्दर्शित योगेश सोमण लिखित 'आगंतुक' आणि शेवटी सिॲटल्च्या सुभग ओक लिखित-दिग्दर्शित 'एक साधा प्रश्न माझा' या एकांकिका सादर झाल्या. चार वेगवेगळ्या विषयांवरच्या आणि सादरीकरणाच्या वेगवेगळ्या रुपांनी नटलेल्या तसेच आजच्या प्रश्नांचा मागोवा घेणाऱ्या एकांकिका पाहून प्रेक्षकवर्ग संतुष्ट झाला.

**चित्रपट आणि लघुपटांचा शानदार प्रयोग**

अमिताभ बच्चन कार्पोरेशन निर्मित आणि उमेश कुलकर्णी दिग्दर्शित ('वळू' फेम) 'विहीर' हा चित्रपट आणि त्यांच्याच 'दर्शन', 'गिरणी', 'थ्री ऑफ अस', 'गारूड' आणि 'विलय' या लघुपटांचे प्रदर्शन १७ आणि १८ जुलै रोजी सादर झाले. उमेश कुलकर्णी 'वळू' चित्रपटामुळे खूप नावारूपाला आले. त्यामुळे अमिताभ बच्चन कार्पोरेशनने जेव्हां पहिला मराठी चित्रपट निर्माण करायचे ठरवले तेव्हां त्यांनी उमेश कुलकर्णी यांचेशी संपर्क साधला. 'विहीर' आणि इतर लघुपट पाहिल्यावर त्यांची निवड किती अचूक होती याची प्रचीती प्रेक्षकांना आली.

**मुकुंद मराठे, 'कला', सॅनहोसे**